**परराष्ट्र मंत्र्यांची चीन भेट आणि चीन परराष्ट्र मंत्र्यांसोबत बैठक**

14 जुलै 2025

चीन भेटीदरम्यान, परराष्ट्र मंत्र्यांची समपदस्थ चीनचे महामहिम परराष्ट्र मंत्री, CPC पॉलिट ब्यूरो सदस्य श्री. वाँग यी यांच्या सोबत 14 जुलै 2025 रोजी बीजिंग येथे भेट पार पडली.

2. या बैठकीदरम्यान, मंत्र्यांनी भारत-चीन द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला.  या वर्षी राजनयिक संबंधांच्या प्रस्थापनेची 75 वी वर्षपूर्ती साजरी करण्याच्या उपक्रमांसह नागरिक-केंद्रित प्रतिबद्धतेवर प्राधान्य देऊन संबंध स्थिर करण्यासाठी आणि पुनर्निर्माण करण्यासाठी उभय बाजूंनी केलेल्या अलीकडील प्रगतीची त्यांनी आढावा घेतला.  कैलास मानसरोवर यात्रा पूर्ववत करण्यासाठी चीनच्या वतीने करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल परराष्ट्र मंत्र्यांनी आभार व्यक्त केले.  नागरिक ते नागरिक आदानप्रदानाला चालना देण्याच्या हेतूने उभय बाजूंनी अतिरिक्त पावले उचलण्यावर सहमती दर्शविली. ज्यामध्ये एकमेकांच्या देशात प्रवास आणि थेट विमानांचे उड्डाणं या उपायांचा अंतर्भाव होता.

3. द्विपक्षीय संबंधांमधील प्रगतीसाठी सीमेवरील शांती आणि स्थैर्याचे परिणाम परराष्ट्र मंत्र्यांनी अधोरेखित केले. तणाव निर्मूलनासाठी आणि सीमा व्यवस्थापनाच्या दृष्टीने सुरू असलेल्या निरंतर प्रयत्नांना पाठिंबा दर्शविला.  परराष्ट्र मंत्र्यांनी यावेळी सीमापार नद्यांच्या बाबतीत सहकार्याची गरज अधोरेखित केली. त्यासोबतच चीनच्या बाजूने हायड्रोलॉजिकल डाटा पूर्ववत करण्याची अपेक्षाही व्यक्त केली.  त्यांनी आर्थिक सहकार्याच्या प्रगतीपथावरील प्रतिबंधात्मक व्यापारी उपाययोजना आणि अडथळे यांची देखील चर्चा केली.

4. दोन्ही मंत्र्यांनी सामायिक हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवर चर्चा केली.  यशस्वी SCO अध्यक्षतेसाठी परराष्ट्र मंत्र्यांनी चीनला भारताच्या वतीने पाठिंबा दर्शविला.

5. चर्चा ही रचनात्मक आणि भविष्याचा वेध घेणारी ठरली.  द्विपक्षीय भेटी आणि बैठकांच्या माध्यमातून संपर्कात राहण्यास मंत्र्यांनी सहमती दर्शविली.

6.  दिवसभरातील आपल्या दौऱ्यात परराष्ट्रमंत्री यांनी चीनचे उपराष्ट्रपती महामहिम श्री हान झेंग यांची भेट घेतली आणि चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे मंत्री महामहिम श्री लिऊ जियानचाओ यांची भेट घेतली.  परराष्ट्र मंत्री परिषदेची बैठक आणि SCO संबंधित अन्य उपक्रमांना उपस्थिती दर्शविण्यासाठी परराष्ट्र मंत्री उद्या टियांजिनच्या दिशेनं मार्गस्थ होतील.

बीजिंग

14 जुलै 2025